## संक्षिप्त

### नाफेडमार्फत खरेदी केलेल्या मालाचे चुकारे वेळेत देण्यासाठी शासन हमी

मुंबई – नाफेडमार्फत खरेदी केलेल्या शेतमालाचे चुकारे शेतकऱ्यांना लवकरात लवकर मिळावे म्हणून ५० कोटी रुपये निधी देण्यात येईल. यासाठी शासनाने हमी देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. नाफेडमार्फत २०१३–१४ मध्ये आधारभूत किंमत खरेदी योजनेत २१६ कोटींची खरेदी झालेली आहे. त्यामध्ये उडीद, भूईमूग, तूर, चणा असे धान्य आहे. मात्र शेतकऱ्यांना पैसे विलंबाने मिळत असल्याने त्यासाठी ५० कोटी रुपयांची शासन हमी सहा महिन्यांसाठी मिळावी अशी विनंती पणन महासंघाने केली होती. यापूर्वी पणन महासंघास संरक्षित खतसाठ्यासाठी २०० कोटी रुपयांची शासन हमी देण्यात आलेली होती. त्याच धर्तीवर हा निर्णय घेण्यात आला.

### सुमारे २० हजार कोटींच्या २००५ पूर्वीच्या नोटांची लावली विल्हेवाट!

मुंबई – २००५ पूर्वीच्या सर्व नोटा बाजारातून बाद करण्याचे काम भारतीय रिझर्व्ह बँक खूप धिम्या गतीने सुरु ठेवले आहे. काळ्या पैशाला बाहेर करण्याच्या उद्देशाने आरबीआयने या अभियानाची सुरुवात केली आहे. आरबीआयने यादरम्यान, १ हजाराच्या ६.१८ कोटी नोटांची विल्हेवाट लावली आहे. ज्यांचे एकूण मूल्य ६,१८३ कोटी रूपये आहे. याप्रकारे ५०० रूपयांच्या १०.९८ कोटी नोटांची विल्हेवाट लावली असून, त्यांचे एकूण मूल्य ५,५९४,९५ कोटी रूपये आहे. त्याव्यतिरिक्त १०० रूपयांच्या ३०.१०६ नोटा काढून टाकण्यात आल्या असून, त्यांचे एकूण मूल्य ३,०१०,६ कोटी रूपये आहे. आरबीआयने या वर्षाच्या जानेवारी महिन्यात २००५ च्या पूर्वीच्या नोटांना परत घेण्याची घोषणा केली होती. या अभियानाचा उद्देश खोट्या नोटांना आळा घालणे हा होता. २००५ च्या नंतर चलनात आलेल्या नोटांमध्ये सुरक्षा मानके देऊन सुधारणा करण्यात आल्या आणि नकली नोटांच्या चलनातील प्रचाराला थांबवण्याचा प्रयत्न करण्यासाठी नविन चिन्ह कोरण्यात आली.

### 'मोटी जी' स्मार्टफोन दोन हजारांनी स्वस्त

मुंबई – मोटोरोला कंपनीने भारतात आपल्या 'मोटो जी' स्मार्टफोनच्या किंमतीत दोन हजार रुपयांनी कपात केली आहे. मोटो जी लाँचनंतर या स्मार्टफोनला मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे या मोबाईलची विक्री वाढवण्यासाठी किंमतीत घट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मोटो जीच्या आठ जीबी स्मार्टफोनची किंमत १० हजार ४९९ रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. तर १६ जीबी साठीची किंमत कंपनीने ११ हजार ९९९ इतकी कमी केली आहे. ही ऑफर काही मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

### 'एसबीआयइनटच' प्रचारासाठी कार्यशाळा

मुंबई – देशातील सर्वात मोठी बँक असलेल्या भारतीय स्टेट बँकेने नुकताच ग्राहकांना एसबीआयइनटच' या यंत्रणेची माहिती देणारी कार्यशाळा नुकतीच मुंबईत आयोजित केली होती. एसबीआयच्या ग्राहकांना डिजिटल बँकिंग सुलभपणे हाताळता यावी यासाठी बँकेकडून दिल्ली, कोलकत्ता, बंगलोर, अहमदाबाद या शहरामध्ये अशा प्रकारच्या कार्यशाळा हाती घेतल्या जाणार असल्याचे बँकेने म्हंटले आहे.

### 'फन सिनेमा' नव्या रुपात

मुंबई – बदलत्या ट्रेंडला अनुसरून सिने प्रेक्षकांचे अधिकाधिक मनोरंजन व्हावे म्हणून 'फन सिनेमा'ने आमुलाग्र बदल केला आहे. प्रेक्षकांच्या सर्वोच्च मनोरंजनाला प्राधान्य देत सिनेमागृहात आवश्यक बदल करण्यात आले आहेत व ते आता अधिक आरामदायी असतील, असे फन सिनेमाचे वरिष्ठ उपाध्यक्ष शिरीष हांडा यांनी सांगितले. फन सिनेमाच्या सर्व सिनेगृहात जागतिक दर्जाची 'डॉल्बी एटीएमओस' ही प्रणाली बसवण्यात आली आहे, असेही ते म्हणाले.

### डॉ. मुकेश बत्रा यांना पुरस्कार

मुंबई – पद्मश्री आणि प्रतिष्ठित होमिओपॅथी डॉ. मुकेश बत्रा यांना 'इंडियन ऑफ द इयर' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांना हा पुरस्कार नेटवर्क ७ मिडिया ग्रुपद्वारे आरोग्यनिगा आणि औषध क्षेत्रातील त्यांचे नेतृत्व आणि योगदानाकरिता प्रदान करण्यात आला. डॉ. बत्रा यांनी मुंबईच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये 'युवा लीडर्ससह भारताच्या भविष्याची उभारणी' या विषयावर बीजभाषण केले.

# सरकारचा लवकरच नवा आर्थिक कार्यक्रम - अर्थमंत्री

नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) – सरकार नवा आर्थिक कार्यक्रम 'मिशन' म्हणून राबविणार असून त्यतात प्रत्येक घरटी बचत, पतपुरवठा, पैसे काढणे, विमा आणि पेन्शन आदी सुविधांची तरतूद असणार आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी म्हटले आहे.

जेटली म्हणाले की, यापूर्वी प्रत्येक घरटी बँक खाते उघडण्याचा विचार होता. परंतु आता प्रत्येक घरासाठी आर्थिक कार्यक्रम राबविण्यावर भर देण्यात आला आहे.

'आर्थिक मोहीम' दोन टप्प्यात राबविण्यात येणार असून पहिला टप्पा यंदा



बँकप्रमुख आणि वित्तीय संस्थांच्या सीईओ यांना मार्गदर्शन करताना अर्थमंत्री अरुण जेटली.

१५ ऑगस्टला सुरु होणार असून १४ ऑगस्ट २०१५ ला संपणार आहे. तर दुसरा टप्पा १४ ऑगस्ट २०१८ रोजी संपणार आहे. बहुतांश आर्थिक सुविधा पहिल्या टप्प्यात दिल्या जातील. तर दुसऱ्या टप्प्यात विमा आणि पेन्शन सुविधा दिल्या जातील.

सरकारी बँकांचे प्रमुख आणि वित्तीय संस्थांचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर यांची बैठक आज येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना जेटली बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, यावेळी सरकारने प्रत्येक खेड्याऐवजी प्रत्येक घराला सुविधा मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. देशातील ७.५ कोटी घरांमध्ये बँक खाते नाही. कमीतकमी अंतरावर बँकिंग सुविधा उपलब्ध व्हावी आणि एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक घरातील एकाचे तरी बँक खाते असावे हे सरकारचे लक्ष्य आहे. ते मोठे आव्हान आहे कारण पायाभूत सुविधांचा अभाव आणि कनेक्टिव्हिटी नसणे अशा अनेक अडचणी आहेत.

या बैठकीला वित्तीय सेवा खात्याचे सचिव जी. एस. संधू यांच्यासह सरकारी बँकांचे प्रमुख, वित्तीय संस्थांचे सीईओ आणि वित्त मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# जिग्नेश शाहवर आरोपपत्र दाखल करा

### मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश

### त्यानंतरच जामिनावर निर्णय - न्या. ठिपसे

मुंबई, दि. ३१(वृत्तसंस्था) – फायनान्शियल टेक्नोलॉजी कंपनीचे प्रवर्तक जिग्नेश शाह यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहे. त्यानंतर शाह यांच्या जामीन मंजुरीच्या अर्जावर निर्णय घेण्यात येणार असल्याचे खंडपीठाचे न्यायमूर्ती ठिपसे यांनी सांगितले.

नॅशनल स्पॉट एक्सचेंजमध्ये ५,५७४ कोटी रुपयांचा घोटाळ्याप्रकरणी ७ मे रोजी आर्थिक



गुन्हे शाखा पोलीसांनी जिग्नेश शाह यांना अटक केले होते. त्याच दिवशी एम.सी.एक्स या कंपनीचे माजी व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत जवळगेकर यांनाही अटक करण्यात आले होते.

शाह आणि जवळगेकर यांनी सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये जवळगेकर यांचा जामीन अर्ज न्यायालयाने मंजूर केला होता.

मात्र शाह यांनी पुराव्यांत लुडबूड केल्याप्रकरणी त्यांच्या जामीन मंजूरीस नकार दिला होता. शाह यांना गेल्या ८५ दिवसांपासून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले आहे.

# डिझेल ५० पैसे महागले, पेट्रोल एक रुपयाने स्वस्त

नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) – आंतरराष्ट्रीय तेल बाजारात किंमती घसरल्याच्या परिणाम स्वरूप देशांतर्गत पेट्रोलचे दर १.०९ रुपये प्रतिलीटर घसरले आहेत. मात्र, डिझेलच्या किंमतीत ५० पैशांची वाढ झाली आहे. आज मध्यरात्रीपासून हे नवे दर लागू झाले आहेत. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने ही माहिती देताना दिल्लीत व्हॅटसहित पेट्रोलचे दर १.०९ रुपये प्रतिलीटरने कमी केले आहेत. देशाच्या इतर भागांत व्हॅट कर वगळता हे दर त्याप्रमाणात कमी होतील. त्यामुळे दिल्लीत आता पेट्रोल ७२.५१ रुपये प्रतिलीटर झाले आहे. कंपनीच्या निवेदनानुसार, मागील सप्ताहात आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाच्या किंमती घसरल्या. मात्र, डिझेलच्या किंमतीत टप्प्याटप्प्याने वाढ करण्याच्या सरकारच्या निर्णयानुसार या सप्ताहात ५० पैसे प्रतिलीटरची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीत व्हॅटसहित डिझेलची किंमत ५८.४० रुपये प्रतिलीटर झाली आहे.

# रुपयाने गाठला तीन महिन्यांचा नीचांकी स्तर

मुंबई, दि. ३१ (वृत्तसंस्था) – भारतीय चलन असलेला रुपया आज आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलरच्या तुलनेत ४९ पैशांची घसरण नोंदवत बंद झाला. त्यामुळे रुपयाचा विनिमय दर प्रति डॉलर ६०.५५ रुपये इतका नोंदविण्यात आला.

अमेरिकन अर्थव्यवस्थेला उभारी मिळाल्याने तसेच बँकांकडून संरक्षण आणि व्यापारी देयके देण्यासाठी डॉलरची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात आल्याने रुपया तीन महिन्यांच्या नीचांकी स्तरावर पोहोचला. यापूर्वी २९ एप्रिल रोजी रुपया ६०.५७च्या नीचांकी स्तरावर पोहोचला होता. जुलै महिन्यात रुपया ०.६३ टक्क्यांनी घसरला असून रुपयाची ही सलग दुसरी मासिक घसरण आहे.

दरम्यान, मौल्यवान धातू असलेल्या सोन्याच्या दरात देखील आज वाढ




पाहायला मिळाली. मुंबई सराफा बाजारात आज सोन्याच्या दरात ५० रुपयांची वाढ झाल्याने सोन्याचा दर प्रति तोळा २७,८८० रुपयांवर जाऊन पोहोचला. तर चांदीच्या दराने देखील ४०० रुपयांची उसळी घेतल्याने एक किलो चांदीचा दर ४५,३०० रुपये इतका नोंदविण्यात आला.

# सेन्सेक्समध्ये १९२ अंकांनी घट

### अमेरिकन फेडरलकडून रोखे खरेदीत कपातीच्या घोषणेचा शेअर बाजारावर परिणाम

मुंबई, दि. ३१ (वृत्तसंस्था) – भारतीय बाजारांत आज पुन्हा एकदा मोठी घसरण पाहायला मिळाली. जुलै महिन्यातील ठराविक कराराची समाप्ती आणि अमेरिकन फेडरलकडून पुन्हा एकदा रोखे खरेदीत कपात करण्याच्या घोषणेमुळे मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १९२.४५ अंकांनी घसरला. त्याचबरोबर पुन्हा एकदा २६,०००च्या पातळीच्या खाली येत २५,८९४.९७च्या स्तरावर स्थिरावला.

तर राष्ट्रीय शेअर बाजार असलेला निफ्टी देखील ७०.१० अंकांच्या घसरणीसह ७,७२१.३०च्या स्तरावर बंद झाला. ऊर्जा, बँकिंग, ग्राहकोपयोगी वस्तू, वाहन, माहिती–तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रातील काही आघाडीच्या कंपन्यांच्या समभागांची मोठ्या प्रमाणात विक्री झाल्याने आज बाजारात घसरण झाली. तसेच काही कंपन्यांच्या सकारात्मक तिमाही निकालाचा लाभ देखील बाजाराला मिळू शकला नाही. त्याचबरोबरीने आज आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय चलन असलेला रुपया डॉलरच्या तुलनेत ४६ पैशांनी घसरल्याचा परिणाम भारतीय बाजारांवर पाहायला मिळाला असल्याचे मत बाजारातील जाणकारांनी व्यक्त केले.

आज दिवसभराच्या कामकाजादरम्यान, बांधकाम (०.२४ टक्के), आरोग्य सेवा (०.१७ टक्के), धातू (०.०५ टक्के) आणि तेल व नैसर्गिक वायू (०.२५ टक्के) या क्षेत्रातील समभागांमध्ये तेजी पाहायला मिळाली. तर ऊर्जा (१.३५ टक्के), भांडवली वस्तू (०.८४ टक्के) आणि ऑटोमोबाइल (०.६२ टक्के) या क्षेत्रातील समभागांमध्ये घसरण पाहायला मिळाली.

**टॉप लूज़र — ३१ जुलाई — बीएसई सेंसेक्स 25,894.97 (-192.45)**

| अंक | | % |
|---|---|---|
| 145.00 | एनटीपीसी | -3.01 |
| 391.85 | ऐक्सिस बैंक | -2.52 |
| 1198.00 | महिन्द्रा-महिन्द्रा | -1.73 |
| 97.95 | टाटा पावर | -1.66 |
| 1067.35 | एचडीएफसी | -1.60 |
| 1504.10 | लार्सेन-टूब्रो | -1.33 |
| 2439.75 | स्टेट बैंक | -1.26 |
| 543.65 | विप्रो | -1.23 |
| 1473.00 | आईसीआई बैंक | -1.11 |
| 228.40 | भेल | -1.10 |

पीटीआई ग्राफिक

# पॅनासोनिक–नोकियाचा जपानमध्ये 'हम साथ साथ'चा प्रयोग

नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) – पॅनासोनिक नेटवर्कचा काही भाग नोकिया खरेदी करणार असून जपानमधील ब्रॉडबॅण्ड मोबाइल क्षेत्रात आपल्या सेवेचा विस्तार करणार आहे. यासाठीचा संयुक्त सामंजस्य करार(एमओयू) नुकताच करण्यात आल्याचे नोकियाच्या निवेदनात जाहीर करण्यात आले आहे.

पॅनासोनिक मोबाइल फोनची वायरलेस आधारित कार्यप्रणाली यासाठी नोकियाला उपलब्ध होणार आहे. या कराराची पूर्तता चालू महिन्याच्या सप्टेंबर महिन्यापर्यंत करण्यात येईल आणि एक जानेवारी २०१५ पासून प्रत्यक्षात अंमलात येईल.

त्यानंतर पॅनासोनिकच्या ग्राहकांना जपानमध्ये नोकिया नेटवर्कमध्ये सामावून घेतले जाईल. त्याबरोबरच पॅनासोनिकच्या कर्मचाऱ्यांना देखील नोकियामध्ये सामावून घेतले जाईल.

नोकिया नेटवर्कचे उपाध्यक्ष आशिष चौधरी म्हणाले की, जपान आमच्यासाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे आणि हा करार मैलाचा दगड ठरेल. पॅनासोनिक वायरलेस नेटवर्कच्या मदतीने जपानमधील आमची कामगिरी आणखी सक्षम करता येईल. यामुळे मार्केटमधील नोकियाचा हिस्सा सुधारण्यास हातभार लागेल. याव्यतिरिक्त नोकियाला जागतिक स्तरावरील तांत्रिक क्षेत्रातील नेतृत्व करण्याची नवीन संधी देखील उपलब्ध होणार आहे.

# 'कृषी पीकविमा योजनेचा लाभ घ्या'

अहमदनगर, दि. ३१ (वृत्तसंस्था) – खरीप हंगाम २०१४ साठी लागू करण्यात आलेल्या राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे कृषीमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली आहे.

राष्ट्रीय कृषी पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०१४ करिता केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शेतक–यांसाठी पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ जुलै पर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र यंदाच्या वर्षी पावसाला चांगलाच उशीर झाल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतक–यांना आपल्या शेतात पेरणी देखील करता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतक–यांनी पीक विमा योजनेची मुदत वाढवण्याची राज्य सरकारकडे मागणी केली होती.

# एचएसबीसी बँकेच्या धोकादायक ग्राहकांच्या यादीत युरोपातील मुस्लीम समुदाय!

लंडन, दि. ३१ (वृत्तसंस्था) – जागतिक बँकिंग क्षेत्रातील आघाडीची बँक हाँगकाँग सिंगापूर बँक कॉर्पोरेशन (एचएसबीसी) ने आपल्या धोकादायक ग्राहकांच्या यादीत युरोपातील मुस्लीम समुदायांचा समावेश केला आहे. मुस्लीम व्यक्ती, संस्था किंवा समूह यांना बँकिंग सेवा सुविधा देतांना विशेष काळजी घेण्याच्या सूचना बँकेच्या प्रशासनाकडून जगभरातील शाखांना देण्यात आल्या आहेत. त्या दरम्यान काही खातेदारांचे बँक खाते देखील बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र असे आदेश केवळ वर्ण किंवा धर्म यांवर आधारित नसून खातेदारांच्या आर्थिक उलाढाली आणि वर्तणूक याच्याशी देखील निगडीत आहेत, असा खुलासा बँकेने केला आहे.

याबाबत बँकेच्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही ग्राहक कोण आहे, हे पाहत नाही. तो व्यक्ती आहे की उद्योग आहे. आमच्यासाठी तो ग्राहक आहे. त्यामुळे कोणताही पक्षपात न करता वर्ण, धर्म न पाहता आम्ही बँकिंग सेवा सुविधा पुरवतो. मात्र अस्वीकारार्ह आणि बेकायदा वर्तन करणा–या ग्राहकांवर नियमानुसार बंधने घालणे आवश्यक आहे. फिन्स बेरी पार्क मशिदीचे विश्वस्त खलीद कौमार यांनी अशा प्रकारचे पत्र बँकेने पाठवण्यामागच्या उद्देशांबाबत विचारणा केली आहे. या पत्रातून आमची खाती बंद करणार की नाही, हे निश्चित होत नाही, असे ते म्हणाले.

युरोपात मुस्लीम समुदायाची आर्थिक कोंडी करण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत, असे ते म्हणाले. २००५ पर्यंत मशिदीचे कामकाज अबू हमजा चालवत होते. मात्र मे महिन्यात त्याला अमेरिकेने अतिरेकी घोषित केले. मात्र हमजा याने मशिदीत असतांना कोणतेही गैरकृत्य केलेले नाही आणि त्याबाबत बँकेला तक्रार करण्यात जागा नाही, असे मशिदीचे अध्यक्ष मोहम्मद कोझबार यांनी म्हटले आहे. सन २०१२ मध्ये एचएसबीसी बँकेने अमेरिकन प्रशासनाला १.९ दशलक्ष डॉलरची रक्कम हवालाच्या माध्यमातून वितरीत केल्याप्रकरणी माहिती दिली होती. अंमलीपदार्थांच्या तस्करीसाठी या रकमा उपलब्ध दिल्या असाव्यात, असा अमेरिकेला संशय होता.

# मारुती सुझुकीच्या निव्वळ नफ्यात तिमाहीत २१ टक्क्यांनी वाढ

नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) – ३० जून रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीत देशातील आघाडीची ऑटोमोबाइल कंपनी मारूती सुझुकी इंडियाने २०.६९ टक्के वाढ नोंदविली असून कंपनीचा निव्वळ नफा ७६२.२८ कोटी रुपये नोंदविण्यात आला आहे.

मागील वर्षी याच काळात कंपनीचा निव्वळ नफा ६३१.६० कोटी रुपये इतका होता. यावर्षीच्या पहिल्या तिमाहीतील एकूण विक्री ११,०७३.५१ कोटी म्हणजेच १०.७८ टक्के असून मागील वर्षीच्या ९९९५.१२ कोटी या याच काळातील कामगिरीपेक्षा अधिक आहे.

मारुती सुझुकी इंडियाच्या माहितीनुसार, पहिल्या तिमाहीत कंपनीने दोन लाख ९९ हजार ८९४ वाहने विकली असून २९,२५१ वाहने निर्यात केली आहेत. कंपनीच्या किंमतीतील घट आणि स्थानिक पातळीवर दिल्या गेलेल्या सवलती यामुळे नफ्यात वाढ झाली असून पहिल्या तिमाहीत चांगली कामगिरी करता आली आहे. मुंबई शेअर बाजारात कंपनीच्या समभागांत त्यामुळे २४.०३ टक्के इतकी वाढ दिसली असून सध्या कंपनीच्या समभागाची किंमत २,५५८.१० रुपये इतकी आहे.

# गोव्यातील पर्यटन विभाग पर्यटकांच्या सुरक्षिततेवर भर देणार

मुंबई, दि. ३१ (वृत्तसंस्था) – वर्षभर पर्यटकांच्या सुरक्षेला चालना देण्यासाठी, टुरिझम भवन, पट्टो, पणजी येथे पर्यटन विभागातील अधिकाऱ्यांच्या मदतीने सेन्सटायझेशन वर्कशॉप आयोजित करण्यात आला होता.

या बैठकीमध्ये पर्यटन संचालक, उपसंचालक अरविंद खुटकर, एसपी उमेश गांवकर आणि पीएसआय सचिन गवस यांनी मार्गदर्शन कले. अंदाजे ९७ आयआरबी कर्मचारी या कार्यशाळेत उपस्थित होते. या कार्यशाळेचे उद्दिष्ट पर्यटक पोलिस अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात जबाबदाऱ्या कशा पार पाडायच्या, परिस्थिती कशी हाताळायची आणि तक्रारी कशा सोडवायच्या, याविषयी माहिती देणे हे होते.

सौ. पामेला मस्केरन्हस, उपसंचालक, पर्यटन विभाग म्हणाल्या, देशांतर्गत पर्यटक वर्षभर, हंगामात, ऑफ–सिझनला गोव्याला भेट देतात. गोव्यातील सर्व बिचवर आयआरबी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत आणि कचरा टाकणे, बिचवर मद्यमान करणे, रस्त्याच्या कडेला अन्न शिजवणे, कचरा करणे, पर्यटकांची व प्रामुख्याने महिलांची सुरक्षा, फेरीवाले व भिकारी यांना बिचवर बंदी याविषयी कठोर कारवाई करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. अशी परिस्थिती हाताळण्याबाबत लवकरच प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे.

गोवा हरित आणि सुंदर' राखण्यासाठी कडक नियम अवलंबले जातील. बिचवर मद्यपान करण्यास मनाई करण्यात आली आहे. असे करताना कोणी आढळल्यास ५००० रुपये दंड आकारला जाईल. महिलांना व प्रामुख्याने परदेशी पर्यटकांना त्रास व अत्याचार करताना कोणी आढळल्यास पर्यटक पोलीस बलाला हस्तक्षेप करण्यास सांगण्यात आले आहे.

# न्यू इंडिया अ‍ॅश्युरन्सच्या नफ्यात १९ टक्के वाढ




मुंबई – न्यू इंडिया अ‍ॅश्युरन्स कं. लि.च्या निव्वळ नफ्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत १९ टक्क्यांनी वाढ होऊन ३११ कोटी रु. झाला आहे. गतवर्षी वरील कालावधीत तो २६२ कोटी रु. होता. कंपनीने २०१३–१४ आर्थिक वर्षात १०८९ कोटी रुपयांचा विक्रमी नफा मिळवून बिगर विमा क्षेत्रात इतिहास निर्माण केला आहे. या तिमाहीत कंपनीचा जागतिक प्रिमियम १३.२८ टक्क्यांनी वाढून ४०२० कोटी रु. झाला असून गतवर्षी वरील काळात ३५४८ कोटी रु. प्रिमियम गोळा झाला होता.




डी. एस. कुलकर्णी डेव्हलपर्स लि.ने गुरुवारी मुंबईत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत डावीकडून उजवीकडे सुनील घाटपांडे, अभय चौधरी, डी. एस. कुलकर्णी, प्रविण पारसनीस आणि विजयकुमार बडगंडी.



पश्चिम रेल्वेच्या सिनियर डिव्हिजनल फायनान्स मॅनेजरच्या कॉन्फरन्सला मार्गदर्शन करताना प. रेल्वेचे जनरल मॅनेजर हेमंत कुमार. ही कॉन्फरन्स प. रेल्वेच्या चर्चगेट